COTTON Innovate

Weekly Newsletter from Central Institute for Cotton Research, Nagpur

Issue 1, Volume 01, January 2019 A weekly newsletter from ICAR-CICR

## ICAR-CICR held one day farmers' workshop on "IPM of pink bollworm in cotton" at Mozari, Tal. Tivsa, Dist Amravati



ICAR-CICR, Nagpur had conducted a one day farmers' workshop on "Integrated management of pink bollworm in cotton" on 12th Dec, 2018 at Mozari, Tal. Tivsa, Dist Amravati. The programme was arranged under centrally sponsored scheme "NFSM-Commercial Crops: Insect resistance management-IRM PBW". The programme was inaugurated by Dr. Nandini Gokte-Narkhedkar, Head, Division of Crop Protection, ICAR-CICR, Nagpur. Dr. SM Wasnik, Principal Scientist (Extension), Sh. Anil Ingale, DSAO, Amravati; Dr. VS Nagrare, Principal Scientist (Entomology) and Sh. Rahul Satpute, SDAO, Morshi were the dignitaries present on the dias. Dr. Nandini Gokte-Narkhedkar, Principal Scientist (Nematology), Division of Crop Protection, welcomed all the participants and briefed about farmers' workshop programme under centrally sponsored NFSM IRM-PBW and urged the farmers to adopt integrated pink bollworm management strategies recommended by CICR. Dr. S.M. Wasnik, Principal Scientist (Extension), acquainted the farmers about e-Kapas and "Mera Gaon Mera Gaurav" program and appealed farmers to register their contact mobile numbers with the institute to get the benefit of mobile based voice messages and agro-advisories issued by the institute from time to time. The entomologists of ICAR-CICR, Dr. VS Nagrare and Dr. BB Fand guided the farmers on IPM strategies for cotton insect pests, with a special reference to pink bollworm. Plant pathologists, Dr. SP Gawande and Dr DT Nagrale delivered lectures on safe handling of pesticides and integrated disease management in cotton. More than 400 farmers from nearby villages of Tivsa tehsil attended the programme.











## News Paper Coverage



Daily Exclusive

देशोन्नती सोमवार, दि.१७ डिसेंबर २०

# ३५० शेतकऱ्यांनी घेतले कीड व्यवस्थापनाचे धडे

## कपाशीवरील गुलाबी बोंडअळी एकात्मिक व्यवस्थापन चर्चासत्र

**प्रतिनिधी/** १६ डिसेंबर

**तिवसा :** भा.कृ.अनु.प. - केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व तालुका कृषी अधिकारी तिवसा यांच्यावतीने मोझरी येथील गुरुकुल सभागृहात मंगळवार ११ डिसेंबर २०१८ रोजी कपाशीवरील गुलाबी बोंडअळीच्या एकात्मिक व्यवस्थापनाविषयी एकदिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र शासन पुरस्कृत 'कीटक प्रतिकारक्षमता व्यवस्थापनः गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन रणनीतीचा प्रसार' (आय.आर.एम. - पी.बी.डब्ल्यू.) या प्रकल्पांतर्गत हे चर्चासत्र घेण्यात आले. त्यात तिवसा तालुक्यातील जवळपास ३५० कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घेतला.

या चर्चासत्राचे उद्घाटन डॉ.नंदिनी गोकटे- नर्खेडकर अध्यक्षा (पीक संरक्षण विभाग) कें.का.सं.सं. नागपूर यांच्याहस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर अनिल इंगळे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अमरावती, कें.का.सं.सं चे प्रमुख विस्तार शास्त्रज्ञ डॉ. एस.एम. वासनिक व प्रमुख कीटकशास्त्रज्ञ डॉ.विश्लेश नगरारे, कृषी विज्ञान केंद्र, नागपूरचे विषयतज्ञ डॉ.एस.एस.पाटील तसेच उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी राहुल सातपुते हे उपस्थित होते.

शेतकऱ्यांना मार्ग दर्शन करताना कृषितज्ज्ञ

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ.नंदिनी म्हणाल्या की, कापूस शेतीसंबंधित सर्व भागधारकांनी सामुहिक प्रयत्न केले व सी.आय.सी.आर. ची एकात्मिक रणनीती अवलंबिली, तर कपाशीवरील गुलाबी बोंडअळीचे व्यवस्थापन सहज शक्य आहे. डॉ.वासनिक यांनी सी.आय.सी.आर. द्वारे राबविण्यात येणाऱ्या ई- क्पास या योजनेबद्दल माहिती देऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी यामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले. कृषी अधीक्षक अनिल इंगळे यांनी कापूस लागवडीचे प्रगत तंत्र व जमिनीच्या सुपीकतेनुसार उच्च उत्पादन देणाऱ्या व कीडरोग प्रतिबंधक वाणांचा वापर याविषयी सखोल माहिती दिली.

कें.का.सं.सं चे कीटक शास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब फंड यांनी अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात राबविण्यात आलेल्या गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन प्रकल्पाचा थोडक्यात गोषवारा सादर केला. तसेच प्रमुख कीटकशास्त्रज्ञ डॉ.विश्लेश नगरारे यांनी कपाशीवरील प्रमुख किडींचे एकात्मिक व्यवस्थापन रणनीतीबद्दल कापूस उत्पादकांना मार्गदर्शन केले. वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ.शैलेश गावंडे यांनी कीटकनाशकांचा सुरक्षित वापर तर डॉ.दीपक नगराळे यांनी रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. हा मेळावा आयोजन करण्यामध्ये सी. आय. सी. आर. तर्फे तांत्रिक अधिकारी भाऊसाहेब नाईकवाडी, आय.आर.एम. -पी.बी.डब्ल्यू. प्रकल्पाचे संशोधन सहायक समाधान बंगाळे व प्रकाश घायर, तसेच कृषी सहायक गजानन देशमुख, सुर्यकांत मेखाले, अमोल सराद व सौ.प्रीती शेंडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

ePaper देशोन्नती Mon, 17 December 2018
deshonnati.digitaledition.in/c/34933634



# गुरुकुंज मोझरी येथे शेतकरी कार्यशाळा

**नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचा उपक्रम**

**मंगळवारी आयोजन**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**शिरजगाव मोझरी :** केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व तालुका कृषि अधिकारी तिवसा यांच्यावतीने मोझरी गुरुकुंज येथील गुरुकुल सभागृहात मंगळवार, ११ डिसेंबर रोजी कपाशीवरील गुलाबी बोंडअळीच्या एकात्मिक व्यवस्थापनाविषयी एकदिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्र शासन पुरस्कृत 'कीटक प्रतिकारक्षमता व्यवस्थापनः गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन रणनीतींचा प्रसार'' यावर चर्चासत्र घेण्यात येत असून, तिवसा तालुक्यातील जवळपास ३०० कापूस उत्पादक शेतकरी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या चर्चासत्राचे उद्घाटन नागपूरचे संचालक डॉ. विजय वाघमारे यांच्या हस्ते होणार असून, डॉ. नंदिनी गोकटे- नर्खेडकर अध्यक्षा (पीक संरक्षण विभाग), डॉ. एस.एम. वासनिक प्रमुख विस्तार शास्त्रज्ञ, अनिल इंगळे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व डॉ. राहुल सातपुते उपविभागीय कृषि अधिकारी मोर्शी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शेतकरी मेळाव्यात कीटकशास्त्रज्ञ डॉ. विश्लेश नगरारे व डॉ. बाबासाहेब फंड हे गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन रणनीतीबद्दल मार्गदर्शन करतील. तसेच वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. शैलेश गावंडे व डॉ. दीपक नगराळे हे 'कीटकनाशकांचा सुरक्षित वापर व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन' याविषयी माहिती देतील.

या शेतकरी मेळाव्याला जास्तीत जास्त शेतकरी बंधू-भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब फंड, समाधान बंगाळे व प्रकाश घायर, तसेच कृषी सहाय्यक गजानन देशमुख, सूर्यकांत मेखाले, अमोल सराद व प्रीती शेंडे यांनी केले आहे.

